**जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना/आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत १० + १ शेळी गट पुरवठा करणे या योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०११/प्र.क्र.६२३/पदुम-४,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ११ नोव्हेंबर, २०११

वाचा — १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र.एलव्हीस-२००९/प्र.क्र.४०८/पदुम-४, दि.३१.०१.२०११.

२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे पत्र क्र.एलव्हीस-२००९/प्र.क्र.४०८/पदुम-४, दि.२०.०४.२०११.

३. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.१५.०६.२०११ अन्वये दि.१.६.२०११ रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना —

विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द/अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना ग्रामीण भागात स्वयंरोजगाराद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष घटक योजना,आदिवासी क्षेत्र उपयोजने अंतर्गत १० शेळ्या + १ बोकड तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेअंतर्गत ५ शेळ्या + १ बोकडाचा गट ५० टक्के अनुदान व ५० टक्के लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थेचे कर्ज या तत्वावर पुरवठा करण्याची योजना राज्यामध्ये कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत शेळ्यांच्या बाजारामध्ये चांगल्या पैदासक्षम शेळ्यांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

विविध शासकीय योजने (अनुसूचित जाती उपयोजना / आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने)अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनेतील पशुधनाच्या खरेदीचे आधारभूत दर निश्चित करणे व सर्व योजनांसाठी अनुदान मर्यादा ७५ टक्के करणे यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.१.२०११ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत विविध योजनेतील पशुधनाच्या आधारभूत किंमतीत वाढ करणे, त्याच प्रमाणे अनुदान मर्यादेत ७५ टक्के पर्यंत वाढ करणे संदर्भात सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने सहमती दर्शविली होती. त्याचप्रमाणे शेळ्या व बोकड खरेदीच्या आधारभूत किंमतीत वाढ करण्यास दि.९.४.२०११ रोजीच्या मान्य टिप्पणीद्वारे मा.मुख्य सचिव यांनीही सहमती दर्शविलेली आहे.

राज्यात अंशतः ठाणबंद पध्दतीने शेळीपालन अंतर्गत १० शेळ्या + १ बोकड असा शेळी गट पुरवठा या विशेष योजनेस राज्यस्तरीय योजनांतर्गत योजना (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी क्षेत्र उपयोजना ) दि.१.६.२०११ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर योजनेअंतर्गत उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या शेळीची आधारभूत किंमत प्रति शेळी रू ६,०००/- तर बोकडाची आधारभूत किंमत प्रति बोकड रु.७,०००/- आणि स्थानिक जातीच्या शेळीची आधारभूत किंमत प्रति शेळी रु.४,०००/- व बोकडाची आधारभूत किंमत प्रति बोकड रु.५,०००/- करण्यास त्याचप्रमाणे अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना १० शेळ्या + १ बोकड या गटाचा पुरवठा ७५ टक्के अनुदानावर करण्यासही मंत्रीमंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

जिल्हा परिषद, लातूर.
पशुसंवर्धन विभाग
कार्यासन :- ५
दिनांक :- 19/12/2011
अ.वि.क.अ. प.वि.अ. वि.प.से.अ. अ.ने.मु.का.अ.